# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.04.2026** **वार: बुधवार**

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
2. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभरात उत्साहात साजरी; राज्याभरातून अभिवादन
3. नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक खासदारांना पत्र लिहिण्याचं पंतप्रधानांचं महिलांना आवाहन आणि
4. महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणं अनिवार्य

**<u>राष्ट्रपती दौरा-नागपूर</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. नागपूर एम्सच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात 210 विद्यार्थ्यांना पदवी आणि सुवर्ण पदकं प्रदान करण्यात येणार आहेत. याशिवाय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय महसूल सेवेच्या 78व्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्या राष्ट्रपती वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालयाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार असून त्यानंतर त्या सेवाग्राम इथल्या गांधी आश्रमाला भेट देतील.

**<u>डॉक्टर आंबेडकर-जयंती</u>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती काल देशभरात विविध उपक्रम, संकल्प यांच्यासह साजरी करण्यात आली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांबरोबरच सर्वसामान्यांनी पुष्पहार अर्पण केले तसंच त्यांच्या स्मृती स्थळांना भेट देऊन वंचित, उपेक्षितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या डॉक्टर आंबेडकर यांना अभिवादन केलं.

'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचं शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे', असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं. दादरच्या चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह मंत्रीगण यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले.....

**हे जे आर्थिक विचार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एकोणीसशे तेवीस साली सांगितले होते त्या पुस्तकात नमूद केले होते आजच्या ग्लोबलाइज्ड अर्थकारणामध्येही तेच सगळ्यात महत्त्वाचे ठरत आहेत तेच सुप्रस्तुत ठरत आहेत आणि त्याच्यावर आधारितच संविधानाने आपली अर्थव्यवस्था उभी केली आहे आणि म्हणूनच आता आपण जगातली तिसरी अर्थव्यवस्था होतो आहोत आणि लवकरच दुसरी आणि पहिल्याकडे आपण वाटचाल करू आणि त्याची दिशा देणारं आपलं संविधान आणि ते संविधान लिहिणारे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत.**

नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमी वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि अखिल भारतीय धम्मसेना यांनी संयुक्तपणे डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या उपस्थितीत बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पमाला

अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. संविधान चौकात विविध संघटना आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केलं.

'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष सामाजिक प्रगतीसाठी अंमलात आणा. समाजातील तरुण पिढीला, विशेषतः विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उद्योगासाठी प्रत्यक्ष मदत करणे हीच महामानवाला खरी आदरांजली ठरेल', असं प्रतिपादन राज्याच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी काल पुण्यात केलं.

'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वदूर पोहोचवण्याकरिता शासन कितीही खर्च करण्यास मागेपुढे पाहणार नाही. बाबासाहेबांचं जागतिक दर्जाचं स्मारक आंबडवे या त्यांच्या मूळ गावी केलं जाणार असून, त्यासाठी आर्थिक अन्याय होणार नाही', अशी ग्वाही रत्नागिरीचे पालकमंत्री आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. सामंत आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्याला आणि अस्थिकलश स्थानीही पुष्पहार अर्पण करण्यात आला.

नाशिकमध्ये नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सायकल राईड अत्यंत उत्साहात पार पडली.

परभणीमध्ये भिखू संघाच्या वतीनं सामूहिक महावंदना घेण्यात आली. यावेळी पंचशील ध्वजारोहण समता दलानं रॅली काढून अभिवादन करण्यात आलं.

साताऱ्यातही समता दिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांच्या जयघोषात सहभाग घेतला.

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातल्या पातुर्डा या गावात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी विहिरीचं पाणी काढून एक सार्वजनिक विहीर दलितांसाठी खुली केली होती. ही विहीर जतन करण्यात आली असून या विहीरीचं काल पूजन करण्यात आलं.

राज्यात ठिकठिकाणी आतषबाजी,रॅली, बाबासाहेबांच्या जीवनातील प्रसंग दाखवणारे जिवंत देखावे, रांगोळ्या, निबंध वक्तृत्व स्पर्धा, अश्या विविध कार्यक्रमांनी डॉक्टर आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

**<u>पंतप्रधान-पूल</u>**

देशाच्या धोरण-निर्मितीमध्ये आणि निर्णय-प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग असेल तेव्हाच विकसित भारताच्या उभरणीला अधिक बळकटी मिळेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. उद्या म्हणजेच 16 एप्रिल रोजी, 'नारीशक्ती वंदन अधिनियमा'शी संबंधित एका महत्त्वाच्या घटना दुरुस्तीवर चर्चा करण्यासाठी संसदेच विशेष अधिवेशन सुरू होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर देशातील नारी शक्तीला उद्देशून पंतप्रधानांनी एक पत्र लिहिलं आहे. देशातल्या सर्व महिलांनी स्थानिक खासदारांना पत्र लिहून नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करावं असं आवाहन मोदी यांनी या पत्राद्वारे केलं आहे. या निर्णयाचा परिणाम कित्येक शतकांपर्यंत देशावर होईल असं त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे. या सुधारणा मंजूर झाल्यावर देशात लोकसभेच्या साडे आठशे जागा होतील.

**<u>मेधा कुलकर्णी</u>**

नारी शक्ती वंदन विधेयकाला सर्व पक्षांनी पाठिंबा द्यावा, असं आवाहन राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. महिलांना समान संधी देत देशाच्या विकासात त्यांचा सहभाग वाढवणं हे या विधेयकाचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं त्यांनी नमूद केलं. या विधेयकाद्वारे महिलांना राजकीय प्रतिनिधित्व मिळणार असल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

**<u>अग्निशमन-सप्ताह</u>**

राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई तसंच महाराष्ट्र अग्निशमन दल, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सेवेतले अग्निशमन

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रपती पदकं समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली. 'राज्यात अग्निशमन सेवांच्या आधुनिकीकरणासाठी 614 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हा निधी शहरी आणि ग्रामीण भागात प्रभावी अग्निसुरक्षा सेवा पुरविण्यास निश्चितच मदत करेल', असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

**<u>मराठी</u>**

येत्या 1 मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणं अनिवार्य असेल. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता आणि वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषा अवगत नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसंच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीनं परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असंही सरनाईक यांनी सांगितलं आहे.

**<u>उष्णतेची लाट-कृती आराखडा</u>**

उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांच, विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारन मार्गदशक सूचना जारी केल्या आहेत.

लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता जास्त असण्याची शक्यता आहे, त्या पार्श्वभूमीवर या जिल्ह्यातील फेरीवाले, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी यासह अन्य कामगार आणि कोळसा खाण कामगारांसाठी या सूचना आहेत.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार कामाच वेळापत्रक बदलणे, वेळोवेळी पाणी पीत राहणे, ओआरएस ची पाकिटे वाटणे, ठीकठिकाणी सावलीची व्यवस्था करणे आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यासारख्या उपाय योजनांचा यात समावेश आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात उन्हाची तीव्रता वाढली आहे. काल राज्यात सर्वात जास्त म्हणजे 43 अंश सेलसियस कमाल तापमान अकोला इथं नोंदवण्यात आलं. आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार